# प्रेस नोट

दि. २७/०५/२०१४

- मा. भारत निवडणूक आयोगाने दि. ०१/११/२०१३ या अर्हता दिनांकावार आधारीत शिक्षक व पदवीधर मतदारसंघातील मतदार नोंदणी कार्यक्रम घोषित केला होता. त्यास अनुसरुन दि. ०१/०२/२०१४ रोजी शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या मतदार यादयांची अंतीम प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. पदवीधर व शिक्षक मतदार यादीत नाव असलेबाबत खात्रीकरणेसाठी अथवा अधिक माहितीसाठी ०२१७ - २६२०२२८ व ९९२२२६३५३५ या क्रमांकावर संपर्क करावा.

**पदवीधर मतदारासाठी आवाहन**

- सोलापूर जिल्हयातील सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय तसेच तहसिलदार कार्यालय येथे जे मतदार त्या मतदारसंघातील सर्वसाधारण रहिवासी आहेत आणि ०१ नोव्हेंबर २०१३ पुर्वी किमान ३ वर्ष पदवीधर असेल (दि.०१/११/२०१० या अर्हता दिनांक) अशी प्रत्येक व्यक्ती पदवीधर मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ करण्यास पात्र आहेत.
- ज्या मतदारांनी अद्यापी मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ केले नाही अशा मतदारांनी त्यांचे नाव मतदारयादीत समाविष्ठ करणेकामी दिनांक ०३/०२/२०१४ पर्यंत फार्म क्र. १८ सादर करावा. अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्रावर संबंधित BLO, पोस्ट मास्तर, पदनिर्देशीत अधिकारी, नायब तहसिलदार, ITI प्राचार्य, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी नगरपालिका किंवा जिल्हयातील राजपत्रित अधिका-यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यांनी सांक्षाकित केलेले अर्ज ग्राहय धरणेत येईल.
- सोलापूर जिल्हयाचे संकेत स्थळ www.solapur.nic.in यावर सर्व संबंधित केंद्रीय स्तरीय अधिकारी (BLO) व मतदार सहाय्यता केंद्रप्रमुख, निवडणूक नायब तहसिलदार यांचे मोबाईल क्रमांक व दुरध्वनी क्रमांक उपलब्ध आहेत.

**शिक्षक मतदारासाठी आवाहन**

- शिक्षक मतदार संघाकरीता ०१ नोव्हेंबर २०१३ पुर्वी सलग ६ वर्षापैकी किमान ३ वर्ष शिक्षकाचे पुर्णवेळ काम करणारी व्यक्ती हे शिक्षक मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यास पात्र आहेत.
- ज्या मतदारांनी अद्यापी मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट केले नाही अशा मतदारांनी त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणेकामी दिनांक ०३/०६/२०१४ पर्यंत फार्म क्र. १९ सादर करावा. त्यासोबत (Annexure-II) मध्ये सेवेचा तपशील मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने सादर करावा.
- शिक्षक मतदार यादीतील सेवेचा तपशील दिलेला नसलेने वगळणी केलेल्या मतदारांची यादी सोलापूर जिल्हयाचे संकेतस्थळ www.solapur.nic.in यावर उपलब्ध आहे. अशा मतदारांना आपल्या सेवेचा तपशील दिनांक ०३/०६/२०१४ पर्यत संबंधित तहसील कार्यालयात Annexure-II मध्ये फार्म नंबर १९ सह सादर करावा.

  असे जिल्हाधिकारी सोलापूर यांनी कळविले आहे.

कार्यक्रमाबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा निवडणूक कार्यालय, उपविभागीय कार्यालय व तहसिलदार कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. त्याकरीता सोलापूर जिल्हयाचे संकेत स्थळ www.solapur.nic.in यावर सर्व संबंधित केंद्रीय स्तरीय अधिकारी व मतदार सहाय्यता केंद्रप्रमुख यांचे व त्यांचे व त्यांच्या कार्यालयाचे दुरध्वनी